१४.

(कार्यालयीन कामासाठी) (नगरसचिव कार्यालय)

# मालेगाव शहर महानगरपालिका, मालेगाव.

मौलाना अबुल कलाम आजाद प्रशासकीय भवन, भुईकोट किल्ल्या समोर, रविवार वॉर्ड, ता. मालेगाव.

## महासभा एप्रिल -२०२६

---

सभा क्र.०२ **सुचना** **कार्यपत्रिका क्र.०२**

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ महापालिकेचे कामकाज नियम क्र.१ (क) अन्वये, मा. महापौर यांना असलेल्या अधिकारानुसार मालेगाव शहर महानगरपालिकेची मासिक सर्वसाधरण सभा क्र. ०२ दिनांक २०/०४/२०२६, सोमवार रोजी दु.२:०० वा महानगरपालिकेच्या स्व. साथी निहाल अहमद सभागृह येथे आयोजन करण्याचे निश्चित केले आहे. करीता सर्व सन्माननीय पालिका सदस्य व सर्व संबंधितांना विनंती की, प्रायोजित सभेस निर्धारित वेळी उपनिर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहुन सहकार्य करावे.

---

**सदर सभेस खालील विषयांचा विचार होईल.**

---

**विषय क्र. १६ :-** आयुक्त कार्यालय/जा.क्र./न.स./सा.बा.वि./०१/ दि.२५/०३/२०२६ अन्वये, सखावत हॉटेल पासून ते नॅशनल कंम्पाऊंड पर्यंत उड्डाणपुलाची लांबी वाढविणेकामी पी.एम.सी. नियुक्ती करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. १७ :-** आयुक्त कार्यालय/जा.क्र./न.स./आरोग्य/०३/ दि.०१/०४/२०२६ अन्वये, आरोग्य विभागाकडील ३१४ आशा स्वयंसेविका कर्मचारी यांना प्रती महिना रक्कम रू. २०००/- मानधन अदा करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. १८ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.मोहम्मद खालीद अब्दुल रशीद यांचे यादी अन्वये, महाराष्ट्र राज्यस्तरीय सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेंतर्गत मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य डिंपी. रोड काँक्रीटीकरण करणेकामीचा प्रस्ताव म. शासनास सादर करणेकरीता मान्यता देणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. १९ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.मोहम्मद खालीद अब्दुल रशीद, श्री.अन्सारी मोहम्मद असलम खलील अहमद व इस्लाम पक्षाचे इतर सदस्यांचे यादी अन्वये, जुना आग्रारोड येथे अस्तित्वात असलेल्या उड्डाणपुलाची लांबी सखावत हॉटेल ते नॅशनल पेट्रोल पंपापर्यंत वाढविणेकामी व श्री. निलेश भगवान आहेर यांचे यादी अन्वये, मालेगाव शहरातील अपर पोलिस अधिक्षक यांचे निवासस्थान, कॅम्प रोड ते महात्मा फुले पुतळा ते सुजन थिएटर पर्यंत उड्डाण पुल उभारणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. २० :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्रीमती शेख ताहेरा शेख रशीद यांचे यादी अन्वये, शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या एन.यु.एच.एम. चे उपक्रम व अभियानाचे प्रमुख सिटी प्रोग्राम मॅनेजर यांचे मार्फत घेण्यात आलेल्या उपक्रमांच्या कामाचा आढावा घेणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

पान नं २ वर..

Scanned with OKEN Scanner

**विषय क्र. २१ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.एजाज बेग अजीज बेग यांचे यादी अन्वये,मालेगाव शहरातील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेस दोन फुड अँन्ड ड्रग निरीक्षण मिळणेकामी शासनास प्रस्ताव सादर करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. २२ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.एजाज बेग अजीज बेग व श्री.शेख इमरान शेख सलिम यांचे यादी अन्वये, शहरातील नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मालेगाव महानगरपालिका हद्दीत स.नं. १७६, पवार वाडी या भागात फायरस्टेशन बनविणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. २३ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.निहाल अहमद मो.सुलेमान, सभागृह नेता व श्रीमती फर्जाना शेख आरीफ यांचे यादी अन्वये, मालेगाव शहरातील जुना आग्रारोड पासून ते कुसुंबारोड (मालेगाव शहरातील हद्दीमधील) होणाऱ्या जड वाहतूकीस बंदी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. २४ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.अन्सारी मोहम्मद असलम खलील अहमद यांचे यादी अन्वये, मालेगाव महानगरपालिका मालकीच्या मोकळया जागेवर मनपाच्या प्रशासकीय इमारतीसहीत इतर सर्व कार्यालये, दवाखाने, फायरस्टेशन, गिरणा पंपींग स्टेशन, सर्व जलशुध्दीकरण केंद्र इ. ठिकाणी सोलार सिस्टम बसविणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. २५ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्रीमती यास्मिन फारूख खान कुरेशी व श्री.मोहम्मद आमीर मोहम्मद फारूख यांचे यादी अन्वये, मालेगाव महानगरपालिका मालकीच्या जागेवर बी.ओ.टी. तत्वावर सि.स.नं. ५४० साईट नं. २५२ जुने स्लॉटर हाऊस नयापुरा व स.नं.६४/२,६५/१ मोतीबाग नाका येथील व्यापारी संकुल बांधणेकामी मे.बोरसे ब्रदर्स & कॉन्ट्रक्टर्स धुळे यांनी सदरचे काम मुदतीत पुर्ण केले नसल्याने काळया यादीत टाकणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. २६ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.शर्जील अकील अहमद यांचे यादी अन्वये, वार्ड क्र.०२,द्याने रमजाजपुरा भागात मॅटर्निटी होम सुरू करणे तसेच पाण्याचे टाकीचे अपुर्ण काम त्वरीत पुर्ण करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. २७ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.निहाल अहमद मो.सुलेमान, सभागृह नेता यांचे यादी अन्वये, स.नं. ४४, लाला नगर, सदर वस्तीला हाय्यरपर्चेस घोषित करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. २८ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.शेख कलीम शेख दिलावर यांचे यादी अन्वये प्रभाग क्र. १३ ड येथील किदवाई रोड, शाळा क्रं १ चा परीसरात 'मोहम्मदीया' या नावाने हॉस्पीटल बांधणेकामी व कै.निहाल अहमद मौलवी मोहम्मद उस्मान यांचे नावाने शादी हॉल बनविणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. २९ :- मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.निहाल अहमद मो.सुलेमान, सभागृह नेता यांचे यादी अन्वये मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मिळकती जसे घरे, कारखाने, शॉपिंग मॉल, मार्केटिंग, पॉवरलूम,वाणिज्य इमारती, दवाखाने, हॉस्पीटल, हॉटेल इ. पैकी ज्यांनी बांधकाम परवानगी घेतली नाही अशा सर्व मिळकतधारकांनी तीन महीन्याचे आत बांधकाम परवानगी घेण्यात यावी. बांधकाम परवानगी न घेतल्यास सदर मिळकतधारकांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. ३० :- मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.शेख जलील शेख शफी यांचे यादी अन्वये, आग्रारोड देवीचा मळा ते अक्तराबाद, फार्मेसी रोड, स्लॉटर रोड, इस्हाक सेठ कंम्पाऊंड, आजमी बेकरी पासून ते नॅशनल हायवे पर्यंत या मार्गावरील बंद असलेले डिपी.रोड सुरू करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. ३१ :- मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.मो.मुस्तकिम मो.मुस्तफा, श्री.अन्सारी मोहम्मद असलम खलील अहमद, श्रीमती यास्मिन अल्ताफ बेग व श्री.मोहम्मद आमीन मोहम्मद फारूख, श्री.शेख जावीद शेख अनीस यांचे यादी अन्वये, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील वाढत्या वाहतूक कोंडी होत असल्याने रस्ते मोकळे करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. ३२ :- मा.महापौर यांचे शिफारशीने, जिल्हास्तर नगरोत्थान योजनेंतर्गत सौ.पुनम भाऊसाहेब अहिरे यांचे यादी अन्वये १८ कामे, श्रीमती जिजाबाई दिलीप पवार यांची १३ कामे, सौ.आशाताई प्रकाश आहिरे यांचे यादी अन्वये कामे, सौ.प्राची नरेंद्र पवार यांचे यादी अन्वये ५ कामे, श्री.नितीन निंबा झाल्टे यांचे यादी अन्वये ०२ कामे, सौ.अंजना शिवाजी दाभाडे यांचे यादी अन्वये कामे, सौ.आम्रपाली सचिन बच्छाव यांचे यादी अन्वये ०६ कामे, श्रीमती शगुफ्ता शकील अहमद यांचे यादी अन्वये कामे, श्री.मदन बाबुलाल गायकवाड यांचे यादी अन्वये २४ कामे करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. ३३ :- मा.महापौर यांचे शिफारशीने, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेंतर्गत (राज्यस्तर) सौ.घोडके लता सखाराम यांचे यादी अन्वये ०२ कामे, सौ.मिना दिनेश अहिरे यांचे यादी अन्वये ०२ कामे, श्री.दिनेश कमलाकर ठाकरे यांचे यादी अन्वये ०८ कामे, सौ.हर्षिता भारत लाडके यांचे यादी अन्वये ०४ कामे करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

विषय क्र. ३४ :- मा.महापौर यांचे शिफारशीने, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे योजनेंतर्गत श्री.दिनेश कमलाकर ठाकरे यांचे यादी अन्वये ०३ कामे, श्री.नितीन निंबा झाल्टे यांचे यादी अन्वये १३ कामे, सौ.अंजना शिवाजी दाभाडे यांचे यादी अन्वये ०२ कामे, श्री.करनसेन भारत चव्हाण यांचे यादी अन्वये २० कामे, श्री.मदन बाबुलाल गायकवाड यांचे यादी अन्वये १० कामे करणे, सौ.हर्षिता भारत लाडके यांचे यादी अन्वये ०५ कामे करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

पान नं ४ वर..



**विषय क्र. ३५ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, नागरी दलितेत्र वस्ती सुधार योजनेंतर्गत श्री.करनसेन भारत चव्हाण यांचे यादी अन्वये ०५ कामे, श्रीमती शगुफ्ता शकील अहमद यांचे यादी अन्वये ०२ कामे करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. ३६ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.प्रविण (पमूदादा) मनोहर पाटील यांचे यादी अन्वये, नाशिक जिल्हा नियोजन समितीकडून मालेगाव महानगरपालिका हद्दीत एकूण ०४ कामे करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. ३७ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.मो.मुस्तकिम मो.मुस्तफा व श्री.अन्सारी मोहम्मद असलम खलील अहमद यांचे यादी अन्वये, मालेगाव महानगरपालिकेत नव्याने विधी पॅनल व वास्तुविशारद पॅनल यांची नियुक्ती करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. ३८ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.मो.मुस्तकिम मो.मुस्तफा यांचे यादी अन्वये, महानगरपालिका हद्दीतील ११ हजार कॉलनी व मुलभुत सुविधांचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. ३९ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.उध्दव उमाकांत दरेकर यांचे यादी अन्वये, मालेगाव महानगरपालिका क्षेत्रात नवीन आंगणवाडी केंद्र उभारणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. ४० :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.मो.मुस्तकीम मो.मुस्तफा यांचे यादी अन्वये,मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील गुरूवार वार्ड स.नं.१०५, गुलशन ए मालिक फातमा गार्डन संदर्भात विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. ४१ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.अन्सारी मोहम्मद असलम खलील अहमद यांचे यादी अन्वये मालेगाव महानगरपालिका आस्थापना विभागात कार्यरत असलेले प्रभारी आस्थापना पर्यवेक्षक श्री. निलेश जाधव यांच्या नियुक्ती प्रक्रीया संदर्भात विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. ४२ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्रीमती यास्मिन फारूख खान कुरेशी यांचे यादी अन्वये वार्ड क्र.५ बहादुरशाह जफर कंम्पाऊंड पासून ते ख्वाजा कंम्पाऊंड ते जुना आग्रा रोड पर्यंत रस्त्यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण असल्याने सदर ठिकाणी असलेले विकास योजना (डी.पी रोड) रस्ता मोकळा करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. ४३ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.शेख नईम शेख हनिफ यांचे यांदी अन्वये नवापुरा वार्ड, स.नं. १०२/२/३ येथील ओपनस्पेस विकसित करणेकामी ऑल मालेगाव जमेतुल अल कुरेशी, सोशल वेल्फेअर & एज्युकेशन सोसायटी यांना देणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

**विषय क्र. ४४ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.शेख रफिक शेख अफजल यांचे यादी अन्वये, महानगरपालिकेच्या इमारतीस भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद भवन असे नाव देण्यात आले आहे परंतू पत्रव्यवहार करतांना कामकाज करतांना सदर नावाचा उल्लेख करण्यात येत नसल्याने याकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. ४५ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.एजाज बेग अजीज बेग, श्री.शेख जलील शेख शफी, श्री.इम्रान अहमद सलिम अहमद, श्रीमती तबस्सुम बानो शेख सुलतान, श्री.मोहम्मद शकील मोहम्मद सगीर, यांचे यादी अन्वये दरेगाव येथे मुख्य प्रवेशव्दार उभारणे, नॅशनल हायवे पासून फार्मसी कॉलेजकडे, मोती हायस्कुल ङिपी रोड, पवार वाडीकडे, लब्बैक हॉटेल समोरील शिव रोड कडे म्हाळदे शिवार सवंदगाव फाटा येथील सर्व ठिकाणी प्रवेशव्दार उभारणे, श्री.शेख जावीद शेख अनीस यांचे यादी अन्वये आग्रारोड मिनारा हॉटेल जवळ के.डी. (खलील दादा ) या नावाने प्रवेशव्दार उभारणे, श्री.शेख जलील शेख शफी, यांचे यादी अन्वये, आग्रा रोड हाजी शेख शफी पार्क या नावाने प्रवेशव्दार उभारणे, ॲड निलेश एकनाथ काकडे यांचे यादी अन्वये, नामपुर रोड येथे छत्रपती संभाजी महाराज या नावाने प्रवेशव्दार उभारणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**विषय क्र. ४६ :-** मा.महापौर यांचे शिफारशीने, श्री.मोहम्मद खालिद अब्दुल रशीद यांचे यादी अन्वये, गट नं.१०४ द्याने शिवार येथील चौकास "अमिन संदिप" असे नाव देणे, गट नं. ७७ सवंदगाव फाटा येथील वार्डला "बागे –मदिना" असे नाव देणे, श्री.नितीन निंबा झाल्टे यांचे यादी अन्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, स.नं.३३१/१, गल्ली नं. ७, मनपा हद्दीतील सार्वजनिक सभागृहास "लोकनेते चंदनजी म्हसदे" असे नाव देणे, मोहम्मद सलमान अनिस अहमद, नवापुरा वार्ड, स.नं. ११९ खुल्या जागेत शाळा क्र. ४३ च्या इमारतीत माजी शिक्षण सभापती व विरोधी पक्ष नेता कै. अतिक अहमद कमाल अहमद (अतिक कमाल) असे नाव देणे, श्री.आमीनखान शब्बीरखान यांचे यादी अन्वये गुरूवार वार्ड स.नं. २०३ बापू गांधी नगर शादी हॉलला हजरत सिध्दीकी अकबर रह.अलै. असे नाव देणे, , श्री.निलेश भगवान आहेर प्रभाग ११ मधील चौकास राजमाता जिजाऊ चौक असे नाव देणे, कामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

नगरसचिव
मालेगाव शहर महानगरपालिका, मालेगाव

**टिप:-** कार्यालयीन वेळेत विषया संदर्भातील कागदपत्र नगरसचिव विभागात पहावयास मिळतील.

**नगरसचिव जा.क्र. ११८ / २०२६**
**दिनांक १० /०४/ २०२६**

Scanned with OKEN Scanner